# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २१८-२३** **दिनांक :- ११/०७/२०२३**

## नवजात अर्भकास कचरा कुंडीत टाकुन पसार झालेल्या अज्ञात आरोपीतांना २४ तासांत निष्पन्न करुन गुन्हयाची उकल. विरार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

विरार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक ०९/०७/२०२३ रोजी संजिवनी हॉस्पीटल, विरार पश्चिम येथे असलेल्या कच-या कुंडीत नवजात अर्भकास मिळुन आल्याची माहिती विरार पोलीस ठाण्यास प्राप्त झाली होती. सदरबाबत विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. ६८३/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३१५ अन्वये अज्ञात आरोपीताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदरचा गुन्हा नवजात अर्भकाचे संदर्भातील गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे विरार पोलीस ठाणेतील गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने गुन्हयाचे घटनास्थळावरील व आजुबाजुचे परिसरातील सी.सी.टि.व्ही.फुटेजची कौशल्यपुर्ण बारकाईने पाहणी करुन गुन्हा करणारे आरोपी ज्या वाहनातुन आले ते वाहन निष्पन्न करुन आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये आरोपीतांचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.फौ. श्री. बेलदार हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पो.नि. श्री. दिलीप राख (गुन्हे), पो.नि. श्री. विठ्ठल चौगुले (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उप.नि. संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदीप जाधव, इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, संदीप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अंम. मोहसिन दिवान, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, दत्तात्रय जाधव, प्रफुल सोनार यांनी केली आहे.

----0000----